शोध पत्र- शिक्षा

# जॉन ड्युईचे शैक्षणिक तत्त्वज्ञान आणि अध्यापन पद्धती

* प्रा. जिवन जाधव

**प्रास्ताविक :**

डॉ.जॉन ड्युई (John Dewey) हा आधुनिक युगातील विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ व शिक्षणशास्त्रज्ञ! आधुनिक शिक्षणावरच नव्हे तर तत्त्वज्ञान व जीवनातील निरनिराळ्या क्षेत्रातील विचारसरणीवर सर्वात अधिक प्रभाव कोणाचा पडला असेल तर तो जॉन ड्युईचा! कारण तत्त्वज्ञान व शिक्षण याबाबत त्याने सर्वस्वी वेगळे विचार प्रगट केले व जीवनदृष्टीला एक नवीन दिशा दिली.

पाश्चिमात्य देशात शिक्षण विषयक तत्त्वज्ञानाचा सखोल नि सर्वांगिण विचार करणा-या थोर विचारवंताची जी एक मालिका आहे. तिच्यात डॉ.जॉन ड्युई (१८५९-१९५२) यांचे स्थान फार उच्च दर्जाचे आहे. जीवनाचा, त्याच्या स्थिती-गतीचा आणि जीवनविषयी निर्माण झालेल्या सर्व तत्त्वमीमांसांचा आपल्या कुशाग्र व मर्मज्ञदृष्टीने विचार करुन जीवनाची एक नवी दृष्टी देणारे त्यांच्यासारखे ज्ञानमहर्षी व कर्मयोगी फार विरळा.विज्ञानाने मानवी विचारात व जीवनात घडवून आणलेल्या क्रांतीमुळे विचार करण्याचा व समाजरचनेच्या पारंपारिक पध्दती कालबाह्य झालेल्या आहेत, हे जगाला समजावून देण्याचे कार्य डॉ.जॉन ड्युई यांनी केले आहे.

**शिक्षणाचा अर्थ :-**

१. "शिक्षण म्हणजे अनुभवांचे पुन:संयोजन.""Education is reconstruction of experience."

२."तत्त्वज्ञान म्हणजे शिक्षण सिध्दांताचे सामान्यीकरण.""Philosophy is the theory of education in its most general phase."


३."शिक्षण म्हणजे सर्व प्रकारच्या मानसिक शक्तींचा विकास."

४."शिक्षण म्हणजे ही जीवनाची तयारी नसून जीवनच आहे."

५."शिक्षणम्हणजे विशिष्ट सामाजिक सवयी प्रतिचार व वर्तन प्रकारांचे संपादन; ज्यातून मुलांचा व्यक्तिगत विकास तर होतोच शिवाय सामाजिकही."

६."Education is a help given to a small helpless human being to become happy, honest and efficient Person." - John Dewey.

**जॉन ड्युईचे शैक्षणिक तत्त्वज्ञान :-**




**१) कृतीद्वारा शिक्षण :**

जॉन ड्युई शिक्षणात पुस्तकप्राप्त ज्ञानापेक्षा कृती व अनुभव यांना अधिक महत्त्व देतो. म्हणजेच अनुभवांची समृध्दता शिक्षणक्षेत्रात कृतीद्वारेच प्राप्त केली पाहिजे. "कृती प्रथम, त्यातून अनुभव कृतीचा अनुषंगानेच मुलांना शिक्षण मिळालेच पाहिज." पुस्तकी ज्ञान हे निर्जीव शिक्षण असल्यामुळे ही कल्पना जॉन ड्युईला मान्य नाही. म्हणून शिक्षणात प्राध्यान आहे तेथेच खरे ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव हेच सर्व श्रेष्ठ शिक्षण होय. कृतीमधूनच विचार किंवा बुध्दीचा विकास होतो. ज्ञान व कृती यांचे अद्वैत जॉन ड्युईला अभिप्रेत आहे.

"Action is primordial and is followed by experience..... All learning must come as a by product of action." - John Dewey.

**२) शिक्षण : सामाजिक प्रक्रिया :**

जॉन ड्युई व्यक्तिगत विकासाइतकेच सामाजिक कार्यक्षमतेलाही महत्त्व देतो. त्यामुळे शिक्षणातूनच व्यक्तीचा मोठ्या प्रमाणात सामाजिकीकरण होत असल्यामुळे शिक्षणाला मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. त्याच्या मते शिक्षणक्षेत्राद्वारेच व्यक्तीचा विकास होत असल्यामुळे शिक्षण ही मुख्यत: एक सामाजिक प्रक्रिया आहे. सामाजिक जीवनातील कुशलता व्यक्तीला शिक्षणामधूनच प्राप्त होते. म्हणजेच नव्या परिस्थितीनुसार ज्ञानकौशल्यात नवी भर पडते व नवीन मूल्यांची निर्मिती होत असते. मावळत्या पिढीच्या अनुभवाशी, संस्काराशी नव्या पिढीला एकरुप बनविणे, तिला सामाजिक बनविणे हेच शिक्षण प्रक्रियचे स्वरुप आहे. त्यातून मुलांच्या अंगी सामाजिक कार्यक्षमतेचा विकास व्हावा. "शिक्षण म्हणजे विशिष्ट सामाजिक सवयी, प्रतिचार व वर्तनप्रकारांचे संपादन; ज्यातून मुलांच्या व्यक्तिगत विकास होतोच शिवाय सामाजिकही." म्हणून शिक्षणाचे सामाजिकीकरण यावर जॉन ड्युईने भर दिला आहे.

"Education consists in acquisition of characteristic, Social habits, responses, modes of conduct that make the child human and at the same time individual."

**३) लोकशाही तत्त्वाचा शिक्षणातून अविष्कार :**

शिक्षणक्षेत्रात स्वातंत्र, समता व बंधूत्व प्रस्थापित होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. कारण जॉन ड्युईचा लोकशाही तत्त्वज्ञानावर विश्वास होता व लोकशाहीप्रधान शिक्षणावरही. प्रत्येक व्यक्तीला आपल्या नैसर्गिकतेप्रमाणे शिक्षण घेण्याची व आपला विकास करुन घेण्याची संधी मिळाली पाहिजे. एवढेच नव्हे तर सामाजिक हितासाठी त्याला पूर्ण वाव मिळाला पाहिजे. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला तिच्या योग्यतेनुसार विकासाची संधी मिळाली पाहिजे व अशा प्रकारची संधी शिक्षणक्षेत्रात लोकशाहीची तत्त्वे स्वीकारल्यानंतरच व्यक्तीला प्राप्त होऊ शकते. व्यक्ती व्यक्तीमध्ये फरक राहणार नाही. त्यांच्या ध्येयात

व कार्यातही वेगळेपण राहणार नाही. हाच दृष्टीकोन व्यक्ती व समाज याबाबतीतही असला पाहिजे. त्या सर्वांचीच कार्यपध्दती लोकशाही नीतीशी सुसंगत असली पाहिजे. हया ड्युईच्या आग्रहाने मर्म सहज आकलन होईल.

**४) शिक्षण आणि जीवन :**

व्यक्तीचे जीवन म्हणजे अनुभवांची सतत मालिका व सतत पुनर्रचना आहे. निसर्ग व मानवी समाज यांचा समवाय साधण्यासाठी सतत व्यक्तीची धडपड चालू असते. या धडपडीतून, प्रयत्नातून व्यक्ती शिकते व आपल्या अनुभवात भर टाकते. तेंव्हा जीवन आणि शिक्षण यांना परस्परापासून अलग करताच येत नाही. अशा प्रकारे जीवनापासून शिक्षणाला विभक्त करणे ड्युईला नापसंत आहे. त्यांचा मते शिक्षण ही जीवनाची तयारी नसून जीवनच आहे.जीवन आणि शिक्षण अशी फारकत करताच येत नाही. शिक्षण घेताना आपण जणू जीवनच जगतो अशी भावना विद्यार्थ्यात निर्माण झाली पाहिजे. आज घर, शाळा व समाज या तिन्ही क्षेत्रातील वातावरण परस्परांपासून वेगळे असते. परंतू शालेय वातावरणातून मुलांना प्रत्यक्ष वर्तमान जीवनाची-जशा प्रकारचे जीवन तो घरी, शेजारी-पाजारी, क्रीडांगणावर जगतो अशी अनुभूती मिळाली पाहिजे. म्हणूनच जीवनाला आवश्यक असे अनुभव मिळत नसतील तर शिक्षण कृत्रिम होईल.

"The process of education has no end beyond itself. If is its own end.....There is nothing to which growth is relative. Save more growth. There is nothing to which education is subordinate except more education ..... The process and the goal of education are one and the same thing." "Education, therefore is a process of living and not a preparation for future living."

**अध्यापनाच्या पध्दती :-**

अध्यापन करणा-या शिक्षकाच्या अनुभवावर अध्यापन पध्दती हया निगडीत असतात. कोणत्याही विषयाचा विकास परिणामकारक आणि लाभदायकरित्या करता येतो. जॉन ड्युईने प्रकल्प पध्दती व समस्या निराकरण पध्दतींचा पुरस्कार केला आहे.

जॉन ड्युईचे म्हणणे होते की, "समस्यांमधून खरे शिक्षण मिळते. समस्या निर्माण झाली तरच माणूस विचार करतो म्हणून समस्यामधून मानवाची विचारशक्ती जागृत व विकसित होते."

"Thinking is essentially facing a difficulties." - J.Dewey

म्हणजेच जोपर्यत समस्या नाही तोपर्यंत विचार नाही म्हणून ड्युईने विचारांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. "विचार म्हणजे समस्या निराकरण" (Thinking is problem solving) जॉन ड्युईने ध्येये निश्चित करण्यापेक्षा शिक्षण प्रक्रिया अधिक महत्त्वाची मानतो कारण ध्येय हे शिक्षण प्रक्रियापेक्षा वेगळे किंवा त्याबाहेर नसून ते शिक्षण प्रक्रियेतच अंतर्भूत आहेत. प्रक्रिया व ध्येय हया दोन बाबी वेगवेगळया नव्हेत.

**व्याख्या :-**

१. "A whole-hearted purposeful activity proceeding in a social environment." -Killpatrik.

**2.**"Project is a problematic act carried to completion in its natural setting." - Stevhanson.


**१. प्रकल्प (प्रॉजेक्ट) पध्दती - (Project Method)**

डॉ.किलपॅट्रीक यांच्या विचारसरणीवर जॉन ड्युईच्या विचारांचा प्रभाव आहे. किलपॅट्रीक हा प्रकल्प पध्दतीचा जनक आहे. परंतू डयुईने अध्ययनासाठी या पध्दतीवर भर दिलेला आहे.

प्रकल्पाविषयी मनापासून असलेला सहभाग हाच प्रकल्प पध्दतीची यशस्विता अवलंबून आहे. तसेच समस्या उत्पन्न होणे आणि ती सोडविण्याची गरज वाटणे व विद्यार्थ्यांना अधिकाधिक कृतीशील करण्यास प्रवृत्त करणे यावर अवलंबून आहे. अभ्यासक्रमातील पाठ्यघटक हे प्रकल्प पध्दतीद्वारा अधिक प्रभावीपणे अध्यापन केले जाऊ शकते. शैक्षणिक सहली काढणे, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणे, शैक्षणिक साहित्य तयार करणे व बागकाम करणे इत्यादी शैक्षणिक उपक्रम प्रकल्प पध्दतीद्वारे अधिक चांगल्यारीतीने पूर्ण करता येतात. भारतात शिक्षणक्षेत्रात आजकाल या पध्दतीचा उपयोग अध्यापनाची एक पध्दत म्हणून मर्यादित प्रमाणात केलेला आढळतो.

समस्येची जाणीव ज्ञान किंवा स्वरुप.

थोडक्यात समस्या निराकरण पध्दती तसेच प्रकल्प पध्दती यांचा संबंध कृतीशी येत असल्यामुळे जॉन ड्युईने या पध्दतीवर जास्त भर दिलेला




आहे. याखेरीज उत्तम नागरिकांचे गुण विकसित व्हावे म्हणून सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन आणि त्यातून अनौपचारिक पध्दतीने शिक्षण याचाही अध्यापन पध्दतीत समावेश केलेला आहे.

**२.समस्या पध्दती/समस्या निराकरण पध्दती - (Problem Solving Method)**

अध्ययन-अध्यापनपध्दतीसंबंधीचे ड्युईचे विचार त्यांच्या अनुभववादी व प्रयोगनिष्ठ तत्त्वज्ञानावरच अधिष्ठित आहेत. आपण जे शिकतो ते कृतीतूनच विचार करतो ही देखील क्रियाच आहे. काही अडचण झाली, समस्या निर्माण झाली म्हणजेच आपण विचार करु लागतो. समस्या सोडवूनच अनुभव व ज्ञान आपण मिळवतो. म्हणजेच खरे ज्ञान हे समस्यांच्या निराकरणातूनच व्यक्तीला मिळते.ड्युईच्या मते विचारशक्तीचा विकास व ज्ञानप्राप्ती ही समस्यांना तोंड देवून त्यातून मार्ग काढण्याचा प्रक्रियेतूनच होऊ शकतो. परंतू माणूस विचार करतो केंव्हा? तर समस्या अडचण मार्गात निर्माण झाली तरच! "Thinking is problem-solving" किंवा "Thinking is intelligent learning" असे तो म्हणतो. म्हणजेच विचारप्रक्रिया ही समस्यांच्या निराकरणासाठीच असते. **See Fig 3**

जॉन ड्युईच्या मते सभोवतालच्या परिसरातील भौतिक व सामाजिक जीवनातील ज्ञान प्रत्यक्ष कृतीद्वारे व प्रयोगशीलतेचा अवलंब करुन तसेच समस्यांचे विवरण करुन विद्यार्थ्यांना प्रकल्प किंवा समस्या पध्दतीने ज्ञान देता येईल तसेच त्यांच्या विविध शक्तीचा विकास करुन त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करता येईल.

जॉन ड्युईने समस्या पध्दतीच्या पाच पाय-या सांगितल्या आहेत.




**निष्कर्ष :-**

जौन ड्युईच्या कार्यवाही विचारसरणीचा परिणाम म्हणजे कार्याला प्रथम प्राधान्य देणारी अमेरीका आज जगात क्रमांक एकवर आहे. जॉन ड्युईच्या कार्यवादी तत्त्वज्ञानाचा आणि अध्यापन पध्दतींचा प्रभाव देशोदेशींच्या शिक्षण पध्दतीवर पडलेला दिसून येतो. शिक्षणात कृतीला प्राधान्य देणे याचे श्रेय जॉन ड्युईला जाते. त्याने सूचविलेल्या अध्यापन पध्दतीचा वापर केल्याने आज शिक्षणात अमूलाग्र बदल झालेले आहेत. जॉन ड्युईने शिक्षणाची ध्येये व शिक्षण प्रक्रिया वेगळी नसल्याचे सांगून शिक्षण प्रक्रियेतच शैक्षणिक ध्येये अंतर्भूत असतात. शिक्षण म्हणजे प्रत्यक्ष जीवनच आहे असे सांगताना जॉन ड्युईने मानसिक शक्तींच्या विकासावर भर देण्याचा आग्रह धरला आहे. जॉन ड्युईच्या तत्त्वज्ञानाचा व अध्यापन पध्दतीचा आधुनिक शिक्षणावर प्रभाव पडलेला आहे.

**** अभिनव अध्यापक महाविद्यालय, लातूर***

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ.म.बा.कुंडले, ***शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र,*** श्री विद्या प्रकाशन, पुणे.२. प्रा.ना.ग.पवार, ***शिक्षण क्षेत्रातील विचारवंत,*** नतून प्रकाशन, पुणे.३. ग.वि.अकोलकर, ***शैक्षणिक तत्त्वज्ञानाची रुपरेषा,*** श्री विद्या प्रकाशन,पुणे.४. प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे, प्रा.गोरोबा खुरपे, ***शिक्षणाचे तात्त्विक व समाजशास्त्रीय अधिष्ठान,*** ज्योतीचंद्र पब्लिकेशनप्रा.लि.,लातूर.५. डॉ.हिरा अहेर, ***उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण आणि शिक्षक,*** विद्या प्रकाशन, नागपूर.